INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# बुद्ध म्हणजे प्रगतीचा मार्ग

**डॉ. पुरूषोत्तम गुणवंतराव पखाले**
मराठी विभाग प्रमुख
मातोश्री अंजनाबाई समाजकार्य महाविद्यालय,
नरखेड, जि. नागपूर
E-mail: puroshotampakhale@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/08.2021-73261696/IRJHIS2108002

**बुद्ध कोण होते:**

महामानव तथागत बुद्ध ज्या राज्याचे ते राजे होते, त्या ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात भारतात एकुण १६ राजांची सत्ता होती,''त्यांची नावे अंग, मगत,काशी,कोशल, वज्री, मल्ल,चेंदी वत्स, गृरू, पांचाळ, अश्मक, अवंती, गांधार, आणि कंबोज ही राजे त्यावेळी भारतात राज्य करत होते''[१] (पृष्ठ क्र. ३३) बुद्धाचे कुटुबं शाक्य असल्याने, शाक्य यांच कपिल वस्तु राज्य भारत वर्षाच्या ईशान्य कोपरयात बसले होते. ते एक स्वतंत्र राज्य होते परंतु कालांतराने कोशल देशाच्या राजाने चॉक यावर आपले अधिपत्य प्रस्थापित करण्यात यश मिळवले. आणि मग काही अधिकार कोशल राजाकडे गेले. बुद्धाचे तत्कालीन समकालीन राजे हे कोशल राजे आणि राजा प्रसन्नजीत, मगध देशाचा राजा बिंबीसार हे सिद्धार्थाच्या समकालीन राज्य होते. कौशल राजाची राजधानी कपिलवस्तू, कपिलवस्तू हे नाव कपिलमुनी यांच्या नावावरून पडलेले होते असे म्हणता येईल कपिलवस्तु मध्ये जयसेन नावाचा एक शाक्य राहत होता. जयसिंगला अनु नावाचा एक मुलगा होता. त्याचा विवाह पचनाशी झाला त्याला पॉचमुले शुद्धोधन,दैयतोधन, शुक्लोधन, अभिशोधन, अभितोधनव याशिवाय अमिता व प्रतिमा या दोन कन्या होत्या त्यांचे गोत्र आदित्य असून शुद्धाधन हा मोठा मुलगा असल्याचे त्याचा विवाह माया मायची झाला महामायाच्या पित्याचे नाव भजन व आईचे नाव सुलक्षणा होते ते वंशाचे होते. ते अजत्र कोलीय देहदन नावच्या गावी राहात असे. शुद्धोधन हा मोठा असल्याने त्याने शुरपणा दाखविला, तेव्हा त्याला दुसरी पत्नी करण्याची अनुमती मिळाली. आणि त्याने महाप्रजापती ची निवड केली. ती महामायाची मोठी बहीण होती. शुद्धोधन श्रीमंत व्यक्ती होता. त्यांचेकडे पुष्कळ नोकर, चाकर होते. त्यांची जमीन नागरणासाठी १००० नागराची आवश्यकता असे. शाक्य लोकांमध्ये प्रतिवर्षी 'आषाढ' महिना उत्सव म्हणून साजरा करण्याची प्रथा होती. म्हणून ती मोठया थाटामाटात आषाढ महिना साजरा केल्या जात होता त्याच काळामध्ये आषाढ

महिना सुरू असताना उत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे, सातव्या दिवशी गर्भधारणा झाल्याने त्या ठिकाणी तिला स्वप्न पडले, कि सुमेध नावाचा एक बोधिसत्व तिच्यापुढे प्रकट झाला आणि म्हणला,''मी माझा शेवटचा जन्म पृथ्वीवर घेण्याचे ठरविले आहे म्हणून तू माझी माता होशिलका महामायाने मोठया आनंदाने उत्तर दिले आणि त्या क्षणी महामायाला जाग आली''[२] (पृष्ठ क्र. ३५) काही दिवसातच वैशाखी पौर्णिमेला प्रसुती करता महामाया लुंबिनी वनातून देऊदह या माहेरी गावी जात असताना. लुंबिनी वनात तिचे मन अतिशय आनंदी होऊन गेले तिने त्या ठिकाणी मुक्काम करण्याचे ठरविले तेव्हा तिला पुष्पाने बहरलेल्या एका झाडाच्या फांदी जवळ ती गेली आणि त्या फांदीचे फुलं तोडण्याकरीता तीने वर उंच उडी मारताच तिला प्रसुती वेदना सुरू झाल्या आणि लुंबिनी वनातच सुंदर अशा बाळाला महामायेने जन्म दिला ती वैशाखी पैर्णिमा होती.

आजही आमच्या सुशिक्षित म्हटल्या जाणाऱ्या समाजामध्ये तथागत बुद्धाबद्दल उलट—सुलट गैरसमज निर्माण करून बुद्धाचे स्वतंत्र स्वरूप आणि स्वतंत्र विचारसरणी समाजाला कळूच दिले नाही म्हणून आज पर्यंत बुद्ध धम्म भारतामध्ये अनोळखीच राहला म्हणून बुद्धाबद्दल त्या काळी असलेल्या सामाजिक सौ रचनेविषयी माहिति करून घेणे महत्वाचे आहेत. बुद्धाचे पुर्ण नाव सिद्धार्थ शुद्धोधन गौतम ते शाक्य वंशाचे असून त्यांचे आडनाव शाक्य होते.त्यांच्या गावाचे नाव इसापूर ई.स. पूर्व ५६३ पूर्वी भारतात शाक्य वंशाचे होते जातीव्यवस्था त्याकाळात मुळीच नव्हती. भारतामध्ये समाजाचे ५ गण असायचे शाक्य, लिच्छवी, कोलियन, द्रविड, आणि गौंड पहिला शाक्य म्हणजे शेती करणारा त्याला कण'बी म्हणजे त्या अपभ्रशं नाव कुणबी असे म्हणतात कण म्हणजे माती आणि बि मातीच्या पोटात बियाणे पेरून जो शेती करतो आणि आपल्या परिवाराचा आणि समाजाचा उदरनिर्वाह करतो त्याला कुणबी असे म्हणतात. काही काळाने त्याचे अपभ्रंश होऊन कुणबी म्हणून झाले आजचा ओबीसी वर्ग म्हणचे त्याकाळी शाक्य वंश किंवा शाक्य गण म्हणून गणल्या जायचा. म्हणजे आताचे कुणबी असून शेतकरी कुटूंबातील आहेत. हे भारतीयांनी विसरता कामानये दुसरा वर्ण हा लिच्छवी गांगार म्हणून होता दैत्य, सुर हिरण्यकश्यप राजा प्रल्हाद प्रल्हादाची सेना, मुले कपिल आणि विरोचन कपिल हा सार्थ प्रणिता होता हे आपण आपल्या पदार्थविज्ञान या विषयात शिकतोय. त्याला ऋषभदेव असेही म्हणतात हाच ऋषभदेव म्हणजे जैनदर्शन प्रणेता, तीर्थकार आणि महावीर हे चोविसावे शेवटचे तीर्थकार होते.तिसरा गण म्हणजे कोलियन गण आजचा आपला कोळी समाज कोळी समाज हा राजा असलेला समाज होता. गौतमबुद्धाची आई देवी महामया ही कोळी समाजाची होती त्याकाळी आंतरजातीय अंतर्गत विवाह होत होते म्हणजेच जातीप्रथा नव्हती. आणि चौथा गण द्रविड दक्षिणेतले सातवाहन द्रविद गणातील बुद्धिष्ट राज्य होते यांचाही गण धावीर जरी असला तरी ते अंतर्गत नियम विवाह करीत होते. शेवटचा आणि पाचवा गण गौंड हा महापराक्रमी असून प्राच्यविद्यापंडित असा उल्लेख होत होता.गवळण गणातील राजा गोंड म्हणजेच आजचा आमचा आदिवासी मध्ये प्रदेशातील काही भाग, विदर्भातील काही, भाग छत्तीसगडमधील काही भाग, झारखंड येथील काही भाग, आदीवासी समाज आजही रावणाची पुजा करतो त्याला देव मानतो असे आपल्याला दिसून येते म्हणजे बुद्ध हा शाक्य वंशातील असून त्याकाळी जात वर्ण नव्हते समाजात गण

आणी पती त्याकाळचे गण हे पाच असायचे शाक्य कोळी द्रविडलिच्छवी आणि गण हे पाचही वंश किंवा गण आपापसात परस्पर संबंधित असायचे त्यात कोणताही भेद नव्हता.

**मुल्य धिष्टित बुद्धवाणी :—** अडीच हजार वुर्षापूर्वी भगवान बुद्धांनी भारत आणि भारता परिसरात जवळील अनेक देशांमध्ये परिसरामध्ये बुद्धाच्या वैज्ञानिक वाणीचा प्रसार आणि प्रचार केलेला दिसतो बुद्ध म्हणतात,''जे कुणी माझ्या धम्माची दीक्षा घेऊन माझ्या उपदेशाप्रमाणे श्रद्धापूर्वक वर्तणूक ठेवू इच्छित असतील त्यांनी मुख्यता चार गोष्टीकडे लक्ष पुरवावे या चार गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत, सत्य समागम काळ घडवावा सदा, सर्वदा नामवाचे श्रवण करावे, श्रुत धर्माचे अहर्निश मनन करून सत्य ज्ञान प्रकाशची प्राप्ती करून घ्यावी, सर्वकाळ नितीने वागावे, माझ्या धम्म मार्गात या प्रमाणे प्रवेश केला पाहिजे यासाठी १० गोष्टीचा निषेध करावा लागेल''[३](पृष्ठ क्र. ३५) तुम्ही कोणत्याही प्राण्याची हत्या करू नये अहिंसेचे पालन करावे, चोरी करू नये, देह व मन अपवित्र ठेवू नये, असत्य भाषण करू नये, मद्यपान करू नये, निषिद्ध वेडी अन्न भक्षण करू नये,नशादी करू नये, पुष्पमाला सुगंधी द्रव्य अलंकार व सुंदर वस्त्रे याचा उपयोग आणि ते प्राप्त करण्याची मनिषा ठेवू नये, उंच व अरूंद यावर झोपून नये, सुवर्ण रौप्य गुन्हा करून घेऊ नये, याचा अर्थ मनुष्याने ज्या धर्माची दीक्षा घेतली त्या धम्माप्रमाणे वागले पाहिजे.धम्माचे विरूद्ध कोणीही वागता कामा नये मनुष्यप्राण्याला हानी होईल असे परतुनी कृत्यनिर्माण करू नये. असे बुद्धाला वाटत होते म्हणून बुद्धाने या मूल्याचा पुरस्कार केलेला दिसतो.

**जागतिक दृष्टया बुद्धाचे विचार** :— बुद्धाचा जागतिक दृष्टया विचार केल्यास, बद्धाचे विचार ज्या ज्या देशांनी स्विकारलेले आहेत ते ते देश आज जागतिक दृष्टया मोठया प्रमाणात विकसित झाले असून त्यांच्या बरोबरीने इतर देश स्पर्धा करत असल्याचे दिसते आजच्या घडीला बुद्धाचे विचार जगातील मोठया पंचवीस देशांमध्ये फार मोठया प्रमाणात आचरणात आणले जाते आणि ते देश आज बुद्धाच्या तत्वज्ञानाने पुढे गेल्याचे दिसते उदाहरणर्थ जापान यां देशात सर्वाधिक लोकसंख्या बुद्धाच्या विचारांची असून जगात सर्वात प्रगत असलेला देश आहे त्याद्दष्टीने भारताचा विचार केल्यास भारत हा बुद्धाच्या काळी आणि बुद्धाच्या आचार विचार पालन करणारे बुद्धीष्ट राजे त्याकाळी भारत देशाचा जी. डी. पी. हा त्यात ३० टक्के याच्यावर होता. आज तो आपल्याला मायनस २४ टक्क्यांच्या खाली गेलेला दिसतो बुद्ध राजांच्या कालखंडात भारत हा सोने की चिडिया म्हणून गनल्या जात होता. शिक्षणाची द्वारे सर्वांसाठी खुली होती. स्त्री व पुरूष भेदभाव नव्हता कर्मकांदा पासून दुर गेलेला समाज तेव्हा दिसायचा त्या काळामध्ये नांलदा, तक्षशिला, विक्रमशिला, ही फार मोठी विद्यापीठे होती एकेकाळी जगातील साठ हजार निवासी मुले योगाशास्त्र आणि इतर शास्त्रामध्ये पारंगत असायची डॉक्टर अमर्त्य सेन नोबेल पारितोषिक प्राप्त ते म्हणतात,''भारताचा जी.डी.पी. हा जगाच्या जी.डी.पी. च्या त्याकाळी ३० टक्के पेक्षा जास्त होता.''बुद्ध काळ हा आठशे वर्षाचा असून सम्राट चंद्रगुप्त मोर्य हा पहिला बुद्ध सम्राट असून बृहद्रथ मौर्य हा दहावा सम्राट होता शेवटच्या बुद्ध सम्राटाच्या सैन्यातील पुष्यमित्रशुंग नावाच्या सेनापतीने सम्राटाची हत्या केली आणि बुद्ध साम्राज्याला उतरती कळा लागली त्यानंतर जातीव्यवस्था स्त्री, गुलामगिरी, स्त्रीदास्य, क्रमिक असमानता, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, वर्णव्यवस्था, वैदिक व्यवस्था, निर्माण झाली परंतु याला संत

बसवेश्वर लिंगायत धर्माचे प्रवर्तक यांनी शह देण्याचा प्रयत्न केला त्यानंतर महानुभाव पंथाचे प्रवर्तक संत चक्रधर, संत नामदेव, जगदगुरू तुकाराम तुकोबाराय, श्री. छत्रपती शिवाजी महाराज, श्री. छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, शाहू महाराज आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब यांनी या सनातन वर्णव्यवस्थेच्या विरोधात संघर्ष केलेला दिसतो ऑक्सफर्ड विद्यापीठाने एक हजार वर्षात १०० विद्वानाची नावे जाहीर केली पहिले नाव तथागत बुद्ध, दुसरे नाव वर्धमान महावीर, तिसरे नाव प्रियदर्शी सम्राट अशोक आणि चौथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, या लोकांची भारतीय वंशाची नावे जगामध्ये पहिल्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) बुद्ध आणि त्यांचा धम्म, पृष्ठ क्र. ३३ बुद्धीस्ट रिसर्च असोसिएशन, नांदेड २००३

२) तत्रेव पृष्ठ क्र. ३५

३) तत्रेव पृष्ठ क्र. ३६

४) केळूसकर कृष्णराव अर्जुन, गौतमबृद्धाचे चरित्र, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

५) भगवान बुद्धाचा उपदेश, नेहा प्रकाशन, अशोकनगर, नागपूर १७